# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

परिपत्रक क्र. २७/२०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालये आणि काही मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्त दर्जा प्राप्त झालेला आहे. तसेच नजीकच्या काळात आणखी काही संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांना स्वायत्त दर्जा प्राप्त होण्याची शक्यता आहे.

स्वायत्त महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या समस्या व अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सुकरतेसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करुन परिपत्रक क्र. ३७७/२०२१ प्रसिध्द करण्यात आलेले होते. तसेच सुधारित परिपत्रक क्र. ५०/२०२२ प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करताना काही स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना अडचणी येत असल्याने संबंधित स्वायत्त महाविद्यालयाने परिपत्रक क्र. ५०/२०२२ मध्ये काही बदल सुचविलेले आहेत. सदर बदलांचा मा. कुलगुरू यांनी स्वीकार केला असून यातील शिफारशी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व सन २०१९ एकरूप परिनियम क्र. ३ मधील तरतुदी विचारात घेता स्वायत्तता दर्जा प्राप्त संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात येत आहेत:

१) नवीन अभ्यासक्रमांचा मसुदा त्या त्या कॅलेंडर वर्षाच्या दि. ३१ मार्च पर्यंत विद्यापीठाकडे पाठवावा. विद्यापीठाने संबंधित अभ्यासक्रमांना त्या त्या कॅलेंडर वर्षाच्या ३१ मे पर्यंत प्रमाणित करून स्वायत्त महाविद्यालयांना कळवावे.

२) नवीन अभ्यासक्रम प्रमाणित करण्यासाठीचे प्रस्ताव व अभ्यासक्रमाचा मसुदा संबंधित अभ्यासमंडळाच्या सभेमध्ये अनुसमर्थनार्थ ठेवण्यात येईल. या सभेसाठी संबंधित स्वायत्त महाविद्यालयाच्या संबंधित अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात येईल.

३) स्वायत्त महाविद्यालयांनी संपूर्ण अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा मसूदा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची पात्रता, अभ्यासक्रमाची उदिष्टे, विषयाचे नाव, घटकांचा तपशील, तासिका, श्रेयांक पध्दत, संदर्भ ग्रंथ, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अंतर्गत मूल्यमापनाचे स्वरूप, सत्र परीक्षेचे स्वरूप, गुणांकन, पदवी/पदविकेचा कालावधी, उत्तीर्ण शीर्ष (एकत्र अथवा वेगळे) (Passing Heading), Intake Capacity, इत्यादी विषयी माहिती त्यांच्या अभ्यासक्रमाच्या मसुद्यामध्ये नमूद केलेली असावी.

४) स्वायत्त महाविद्यालये जे नवीन अभ्यासक्रम सुरू करू इच्छितात त्याबाबतचे हमीपत्र त्यांनी विद्यापीठाला सादर करणे आवश्यक आहे. या हमीपत्रामध्ये नवीन अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या

प्रचलित भौतिक सुविधा व आवश्यक मानव संसाधन यांची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयावर आहे हे नमूद करणे आवश्यक आहे.

५) स्वायत्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव पाठवताना लागणाऱ्या आवश्यक व प्रचलित बाबींचा उल्लेख करावा. यासाठीचा नमूना मसूदा हा विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालयांना महाविद्यालयाच्या बी.ओ.डी लॉगीन (Login) वर उपलब्ध करून द्यावा.

६) शासन अधिसूचना दि. १४ जानेवारी,२०१९ अन्वये सन २०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ३ मधील मुद्दा क्रंमाक ६ अन्वये विहीत केल्यानुसार स्वायत्त महाविद्यालयांनी त्यांच्या स्वत:च्या स्तरावर पाठ्यक्रमांसाठीचे शुल्क निश्चित करावयाचे आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती संबंधीचे प्रस्ताव संबंधित महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर शासनाच्या शिष्यवृत्ती विभागाकडे पाठवावेत.

७) स्वायत्त महाविद्यालयांसाठी PRN क्रमांक हा पात्रता क्रमांकाच्या सोबतच विद्यापीठ तयार करील. याचा उपयोग हा ॲकॅडेमिक बॅक ऑफ क्रेडिट च्या अंमलबजावणीसाठी सुध्दा होणार आहे. तसेच स्वायत्त नसलेल्या (Non-Autonomous) महाविद्यालयात प्रवेशित किंवा Non-Autonomous to Autonomous प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नोंदी नोंदवण्यासाठी PRN चा उपयोग होईल.

८) स्वायत्त महाविद्यालयांमध्ये इतर संलग्नित महाविद्यालयांमधून पदवीच्या तृतीय वर्षासाठी किंवा पदव्युत्तर दुसऱ्या वर्षासाठी स्वायत्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती संबंधित स्वायत्त महाविद्यालयाने विद्यापीठाला कळविणे आवश्यक आहे. विद्यापीठाने या विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाच्या परिक्षेसंबंधी व शैक्षणिक पात्रता अद्ययावत करावी.

स्वायत्त महाविद्यालयामध्ये इतर संलग्नित महाविद्यालयांमधून आणि संलग्नित महाविद्यालयामधून स्वायत्त महाविद्यालयात तृतीय वर्षासाठी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची समकक्षता ही महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावी.

९) स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्थेने एकाचवेळी एका विद्याशाखेत दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम/तुकडया करण्यावर कोणतेही बंधन नाही. परंतु भौतिक सुविधा व आवश्यक मानव संसाधन यांची पूर्तता पाहून स्वायत्त महाविद्यालयाने नवीन अभ्यासक्रम/ तुकडया सुरू करण्याचे ठरवावे.

१०) जे अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रस्थापित झालेले नाहीत आणि स्वायत्त महाविद्यालयांनी प्रथमच सुरू केले आहेत व त्यांची पदवी विद्यापीठाने प्रस्थापित केली आहे. त्या अभ्यासक्रमांची स्वायत्त महाविद्यालयांनी तसे शैक्षणिक विभागाचे परिपत्रक जारी केले आहे. अशा अभ्यासक्रमाचे प्रवेश घेतलेले विद्यार्थ्यांची पात्रता करण्यात येईल. स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्याने पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी विद्यार्थी निहाय माहिती सद्यास्थितीत अवलंबण्यात येणारी पध्दत पुढे चालु ठेवण्यात येईल.

११) स्वायत्त महाविद्यालयातील Ph.D. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया, विद्यापीठ परिपत्रक क्र.१५६/२०२१ प्रमाणे असावी.

१२) स्वायत्त महाविद्यालयांनी आकारलेल्या परीक्षा शुल्कामधून १५ टक्के ऐवजी १० टक्के रक्कम विद्यापीठाला देण्यात यावी. यासाठी सध्याच्या परीक्षा शुल्कामध्ये दोन वर्षातून एकदा १० टक्के वाढ करण्यास स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठाची परवानगी राहील.

**टीप: या पूर्वीचे या विभागाचे परिपत्रक क्र. ५०/२०२२ जावक क्र. सीए/१९५, दि. १८ फेब्रुवारी, २०२२ रद्द समजण्यात यावे.**

(डॉ. प्रफुल्ल पवार )
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे—४११००७ )
जावक क्र. सीए/१८६ )
दिनांक — ०६ फेब्रुवारी, २०२३ )

प्रत :

१. मा. प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश आणि पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष, अभ्यासमंडळ) प्रस्तुत विद्यापीठ
५. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) प्रस्तुत विद्यापीठ
६. सहा.कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ